# तहसिलदार मुरूड यांचे कार्यालय मुरूड

# जि.रायगड

## ०० लोकशाही दिन ००

सर्वसामान्य जनता आपल्या अडचणी वारंवार शासकिय यंत्रणेपुढे मांडत असतात. परंतु त्यावर निर्णय घेणारे अधिकारी व कर्मचारी ब-याच वेळी बैठका, सभा, दौर इत्यादी कारणामुळे जनतेसाठी खात्रीने उपलब्ध होऊ शकत नाहीत. निश्चीत दिवशी शासकिय यंत्रणा जनतेची गा-हाणी ऐकुण घेण्यासाठी व त्याची यंत्रणा जनतेची गा-हाणी ऐकुण घेण्यासाठी व त्याची सोडवणुक करण्यासाठी तत्पर राहील याकरिता प्रभावी उपाययोजना करण्याच्या महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.प्रसुधा-1099/सीआर-23/99/18-अ,दिनांक 29 डिसेंबर 1999 अन्वये लोकशाही दिनाची सुरूवात करण्यात आली.

जिल्हाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रत्येक महीन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन म्हणुन तसेच सोमवारी सार्वजनिक सुटटी असल्यास दुस-या दिवशी म्हणजे मंगळवार लोकशाही दिन राखुन ठेवण्यात येत आहे.सदर लोकशाही दिनात जनतेच्या तक्रारीचे निवारण झाले नाही तर जनतेला न्याय मिळण्यासाठी शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-1001/प्र.क्.70/2001/18 अ, दिनांक 10/11/2001 अन्वये मंत्रालय स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन मा. मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखाली करण्यात येते.

स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न् तात्काळ निकाली निघावेत व सर्व तक्रारीचे निवारण जलद गतीने होण्यासाठी शासन परिपत्रक क्र. महालो/1007/212/ प्र.क्र./53/07/18-अ, दिनांक 7 नोव्हेबंर 2007 अन्वये बृहमुंबई, पुणे, व नागपुर या महानगरपालिका प्रमाणेच उर्वरित सर्व महानगरपालिका मध्ये पहिला सोमवारी महानगरपालिका " लोकशाही दिन " आयोजीत करण्यात येतो.

त्यानंतर जनतेच्या समस्या तालुका स्तरावर सोडवण्याच्या दृष्टीने या सदर कार्यपध्दतीत सुधारणा करुन सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी/अडचणी याची न्याय व तत्परतेने शासकिय यंत्रणेकडुन सोडवणुक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणुन शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-2011/प्र.क्र.189/11/18-अ, दिनांक 26 सप्टेंबर 2012 अन्वये " लोकशाही दिन " हा तालुकास्तरावर सुध्दा राबविण्यात येत आहे.

| लोकशाही दिनाचा दिवस | लोकशाही दिनाचा स्तर |
| --- | --- |
| प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार | मंत्रालय स्तरावर तथा महानगर पालिका स्तरावर राबविण्यात येतो. |
| प्रत्येक महिन्याच्या दुसरा सोमवार | विभागीय आयुक्त स्तरावर राबविण्यात येतो. |
| प्रत्येक महिन्याच्या तिसरा सोमवार | तालुका स्तरावर राबविण्यात येतो. |

वरील प्रमाणे प्रत्येक स्तरावर लोकशाही दिन पाळण्यात येतो.या दिवशी सार्वजनिक सुटटी असल्यास त्यानंतर येणा-या कामकाजाच्या दिवशी म्हणजे मंगळवारी लोकशाही दिन म्हणुन पाळण्यात येतो.

## लोकशाही दिनाचे अध्यक्ष:

1. तालुका लोकशाही दिन ----------- तहसिलदार
2. जिल्हा लोकशाही दिन ----------- जिल्हाधिकारी
3. महानगरपालिका लोकशाही दिन --- म.न.पा.आयुक्त्
4. विभागीय लोकशाही दिन ----------- विभागीय आयुक्त्
5. मंत्रालय लोकशाही दिन ------------ मा.मुख्यमंत्री महोदय

## लोकशाही दिन आयोजित करण्याचे स्थळ व वेळ:

वरील सर्व स्तरावरील लोकशाही दिन संबंधित स्तरावरील मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात येतात.

मुरूड तालुक्यात प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी तहसिलदार यांचे कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजित करण्यात येतो.

## अर्ज स्विकृतीचे निकष :

1. अर्ज विहित नमुन्यात असावा (नमुना प्रपत्र 1अ ते 1ड)
2. तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी.

तहसिलदार मुरूड-जंजिरा सत्यमेव जयते रायगड